अधिनियम १९६१ मधील कलम १२३ खाली सदरहू योजना अभिकरण तत्वावर चालविण्यासाठी हस्तांतरीत करणेबाबत -

(४)

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग,
शासन नि.क्र. एफएसएस-१०९१/५५२५७/प्र.क्र.४४६/सां.का.१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १८ जून, १९९२.

वाचा : १) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. झेडपीए-१०८९/सीआर-१३९२/२४, दिनांक २९ मे, १९८९.

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. एफएसएस-१०९०/प्र.क्र.३००/सां.का.१, दि. १६ मार्च, १९९१.

३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. झेडपीए-१०९०/सीआर-१६५२/२४, दिनांक ७ जानेवारी, १९९२.

शासन निर्णय - शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एफएसएस-१०९०/प्र.क्र.३००/सां.का.१, दिनांक १६ मार्च, १९९१ अन्वये (प्रत सोबत जोडली आहे) "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलाकारांना मानधन" या योजनेत सुधारणा करण्यात येऊन सुधारित योजना सदरहू शासन निर्णयाच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिलेल्या नियमानुसार कार्यान्वित [illegible] आहे. सदरहू नियमातील नियम क्रमांक १० अन्वये या योजनेखाली मंजूर कर[illegible]त येणाऱ्या मानधनाची रक्कम वर्षातून दोनदा देण्याची तरतूद आहे. या योजनेखाली मानधन मिळणाऱ्या कलाकारांनी सदरहू मानधन निवृत्ती वेतनाप्रमाणे दरमहा मिळण्याबाबत शासनास केलेली विनंती शासनाच्या विचाराधीन होती. विचारांती शासन सदरहू योजनेतील नियम क्र. १० शिथील करुन मंजूर मानधन कलाकारांना दरमहा अदा करण्यास मंजूरी देत आहे. हे मानधन कलाकारांना दरमहा अदा करता यावे यासाठी "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलाकारांना मानधन" ही योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२३ अन्वये अभिकरण तत्वावर

...२/-

Scanned with CamScanner

राबविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीवर सुपूर्द करण्यास शासन या शासन निर्णयान्वये मंजूरी देत आहे :-

योजनेचे नांव :- महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यीक व वृध्द कलाकारांना मानधन योजना.

अटी व शर्ती :-

१) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र.१०९०/प्र.क्र.३००/सां.का.१, दिनांक १६ मार्च, १९९१ अन्वये निर्धारित केलेल्या नियमानुसार ही योजना गट विकास अधिका-यांमार्फत राबविण्यात यावी.

२) सदरहू योजनेवर सर्वस्वी नियंत्रण संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राहील.

३) मानधनाची रक्कम संबंधित साहित्यिक/कलाकारांना दरमहा गट विकास अधिका-याने अदा करावी. या मंजूर रकमेतून मनिऑर्डर कमिशन वजा करुन उर्वरित रक्कम दरमहा मनिऑर्डरव्दारे कलाकारांना अदा करावी.

४) मानधनाची रक्कम संबंधित व्यक्तींना अदा करण्यापूर्वी प्रत्येक ६ महिन्यांनी संबंधित व्यक्ती हयात असल्याबद्दलचा दाखला त्या व्यक्तीकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

५) मानधन मंजूर केलेल्या साहित्यिक/कलाकार व विधवा पत्नी यांच्या नावाच्या पत्त्यांसह यादी व मानधनाची रक्कम व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली तरतूद वर्षाच्या सुरुवातीस संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्याकडून प्रत्येक जिल्हा परिषदेकडे सुपूर्द करण्यात येईल.

६) या योजनेंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी साहित्यिक/कलाकार/विधवा पत्नी यांनी विहित नमुन्यात केलेले अर्ज गट विकास अधिका-यांकडे प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र.एमएस-१०९०/प्र.क्र.३००/सां.का.१, दि.१६ मार्च, ९१ अन्वये मान्य केलेल्या नियमानुसार संबंधित गट विकास अधिका-यांनी या अर्जांची प्रत्यक्ष तपासणी/छाननी करुन

...३/-

Scanned with CamScanner

त्यानुसार अभिप्रायासह सदरहू अर्ज प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबर किंवा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त १ महिन्याच्या आत संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांच्याकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

७) गट विकास अधिकारी यांच्या शिफारशीसह प्राप्त झालेले नवीन अर्ज शासन निर्णय दि. १६ मार्च, १९९१ अन्वये यासाठी नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीपुढे सादर करुन समितीच्या निर्णयानुसार या संदर्भातील पुढील कार्यवाही करण्याची सर्व जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची असेल व त्यांनी काढलेल्या आदेशानुसार मंजूर रक्कम गट विकास अधिका-याने संबंधितांना दरमहा अदा करावयाची आहे.

८) मानधन मंजूर केलेल्या साहित्यिक/कलाकार किंवा विधवा पत्नी याचे निधन झाल्यास त्याबद्दलची सविस्तर माहिती संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

२. या योजनेतंर्गत मंजूर मानधन कलाकारांना दरमहा अदा करता यावे यासाठी कलाकारांची जिल्हावार व पंचायत समितीवार यादी पत्त्यांसह व आवश्यक त्या तरतूदीसह वर्षाच्या सुरवातीस संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यातर्फे संबंधित जिल्हापरिषदेकडे सुपूर्द करण्यात येईल. कलाकारांना मंजूर करण्यासाठी जिल्हापरिषदेकडे सुपूर्द केलेल्या आर्थिक तरतूदीमधून या व्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबींवर जिल्हापरिषदेस खर्च करता येणार नाही.

३. सदरहू मानधन कलाकारांना दरमहा अदा करण्यासाठी गट विकास अधिकारी यांना या योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. गट विकास अधिका-याने मंजूर मानधनातून मनिऑर्डर कमिशन वजा करुन उर्वरित रक्कम दरमहा कलाकारांना अदा करावी.

४. बृहन्मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातंर्गत ही योजना शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९१ नुसार सध्याच्या कार्यपध्दतीनुसारच राबविण्यात येईल. या विभागातील कलाकाराचे मानधन दरमहा कलाकारांना अदा करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.



Scanned with CamScanner

५. हा शासन निर्णय ग्राम विकास विभाग व वित्त विभागाच्या संमतीने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ९२७७/व्यय-११, दिनांक २१.५.९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[व. बं. कांबळे]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ [लेखा परीक्षा] मुंबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षाधिकारी, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व तालुका पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, वाशी, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती विभाग.
ग्राम विकास विभाग [का. २४] मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, का. सां. का. १, स. क. सां. का. क्री. व प. विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

क्र. सांकार्य/८१६०

सुचिपत्र

अर्जाचा नमुना

[दोन प्रती भरून पाठविणे]

सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
नवीन सचिवालय, विस्तार भवन,
१ ला मजला, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०० ०३२.

१. आर्थिक मदतीकरीता अर्ज करणारी व्यक्ती याचे संपूर्ण नांव व पत्ता :

२. ज्या कलावंताला वा लेखकाला वा त्याच्या विधवा पत्नीला आर्थिक मदत हवी आहे त्या कलावंताचे वा लेखकाचे संपूर्ण नांव :

३. कलावंताचे वा लेखकाचे पूर्ण वय :

४. कलावंत वा लेखकाचा वा विधवा पत्नीचा पूर्ण पत्ता :

५. कलावंत किंवा लेखक यांनी केलेल्या कलेची व लिखाणाची संपूर्ण व सविस्तर माहिती [वाटल्यास वेगळ्या कागदावर माहिती लिहावी] त्या त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, तज्ञ यांनी प्रमाणित केलेली.

६. वार्षिक उत्पन्नाच्या बाबी -

[अ] निरनिराळ्या साधनांचे येणारे उत्पन्न [वर्गीकरण करून माहिती द्यावी]

[ब] स्थावर मिळकतीचे उत्पन्न

[क] इतर जाहिराती अगर हक्कापासून येणारी मिळकत

[ड] इतर काही बाबींपासून येणारी मिळकत [प्रत्येक मुख्य बाबीवरून स्वतंत्रपणे मिळकत द्यावी]

७. कलावंत वा लेखक यांच्या कुटुंबातील मिळवित्या माणसांची नावे, पत्ता व नाते व त्यांचे वार्षिक उत्पन्न [ वाटल्यास वेगळ्या कागदावर माहिती लिहावी. ]

Scanned with CamScanner

८. कलावंत वा लेखक यांच्या कुटुंबातील

[अ] अवलंबून असलेल्या माणसांची नावे
वय, नाते व धंदा

[ब] इतर कोणी अवलंबून असतील
त्यांची नावे, वय व धंदा

९. आर्थिक मदत किती पाहिजे –

[ज्या खर्चाच्या बाबी, उदाहरणार्थ मुलाचे शिक्षण, औषधोपचारासाठी लागणारा खर्च अशा असतील त्यावर येणारा खर्च वेगवेगळया त-हेने स्पष्टपणे दाखवावा. ]

१०. पूर्वी कधी शासनाकडून आर्थिक मदत मिळाली होती काय ? जर मिळत असेल तर कोणकोणत्या साली मिळाली ? किती मिळाली ? व कोणत्या कारणास्तव मिळाली ?

११. महाराष्ट्र शासनाकडून किंवा अन्य शासनाकडून सांप्रत आपणास इतर काही आर्थिक मदत मिळते काय ? किती ? कोणत्या कारणास्तव ? कुणाकडून ?

टिप :- अर्जासोबत अर्जदाराने खालील प्रमाणे माहिती सादर करावी :

१. कलाकार, साहित्यिक वा त्याच्या विधवा पत्नी याचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे राजपत्रित अधिका-यांनी किंवा तत्सम प्राधिकार दिलेल्या इतर अधिका-याने प्रमाणित केलेले एक छायाचित्र.

२. त्याच्या जन्म तारखेचा दाखला किंवा त्या संबंधीचे सरपंच, तहसिलदार, शासकीय रुग्णालयाच्या डॉक्टराने प्रमाणित केलेले अधिकृत कागदपत्र.

३. कलाकार, साहित्यिक यांच्या कला जीवनाबाबत व साहित्याबाबत त्या त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, तज्ञ, संबंधित संस्था इत्यादींनी किंवा ग्रामपंचायतीच्या सरपंचानी त्यांच्या विषयी प्रमाणित केलेली माहिती.

सही :

Scanned with CamScanner

डिक्लेरेशन

[फक्त अर्जदाराने भरावयाचे]

वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

सही :

गट विकास अधिकारी तालुका पंचायत समिती मार्फत रवाना

---

गट विकास अधिकारी तालुका पंचायत समिती यांची शिफारस

[अ] अर्ज दाखल झाल्याची तारीख :

[ब] रिपोर्ट

[क] शिफारस

[गट विकास अधिकारी तालुका पंचायत समिती यांनी अर्जाची एक प्रत जवळ ठेवावी.]

ठिकाण :

तारीख :

गट विकास अधिकारी
तालुका पंचायत समिती

मचित्रंद्र२८६८२

Scanned with CamScanner